
ARTHA, Poona 4
Tel 55627

# अर्थ

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, ४ डिसेंबर, १९६८ | अंक २३





## पाणी म्हणजेच जीवन



किर्लोस्कर

### किर्लोस्कर पंप पाहिजे तेथें आणि पाहिजे तेव्हां पाणीपुरवठा करतात.



किर्लोस्कर पंप—राष्ट्रीय जीवनाचें एक अंग

आपल्या राष्ट्रीय जीवनांत किर्लोस्कर पंप महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ किर्लोस्कर पंप देशांत सर्वत्र शेती, कारखाने व शहरें यांची पाणीपुरवठ्याची गरज अत्यंत कार्यक्षमतेनें पुरी करीत आहेत. शेती व कारखाने यांना लागणारे विविध प्रकारचे पंप आपल्या आवश्यकतेनुसार मिळूं शकतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
रोड, पुणे-१. (महाराष्ट्र)

### बँक कर्मचारी प्रथम निर्दोषी, नंतर २ वर्षे सक्तमजुरी शिक्षा, नंतर पुनः निर्दोषी

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पाथर्डी शाखेत १९६१ मध्ये आत्माराम श्रीपाद गोसावी आणि तुळशीराम वाघमारे हे अनुक्रमे असिस्टंट इन चार्ज व कारकून होते. काही खात्यांच्या बाबतीत त्यांनी विश्वासघात केल्याचे आरोपावरून त्यांचेवर १९६३ मध्ये फौजदारी केली होती. सेशन्स कोर्टाने गोसावीस निर्दोषी ठरवून वाघमारेस शिक्षा केली होती. वाघमारेने ह्या शिक्षेविरुद्ध आणि महाराष्ट्र राज्य सरकारने गोसावीच्या मुक्ततेविरुद्ध हायकोर्टात अपील केले. खटला नीट चालविला गेला नव्हता आणि योग्य तो पुरावा पुढे आणला गेला नव्हता, ह्यासाठी डिव्हिजन बेंचाने दोन्ही आरोपींवरील खटला पुनः चालविला जावा, असा हुकूम केला. त्यात दोघेही दोषी ठरून दोघांनाही दोन वर्षे सक्तमजुरी व १,५०० रु. दंड अशी शिक्षा झाली. गोसावीने त्यावर अपील केले. " असिस्टंट इन चार्ज ह्या नात्याने शाखेची सर्वसाधारण देखरेख करणे हे माझे काम होते. बँकेच्या गिऱ्हाइकांशी बोलणे, त्यांना भेटणे, कर्जव्यवहार पाहाणे, गुदामे तपासणे, इत्यादी कामे मला करावी लागत. लेजर्स, डे-बुके, इत्यादी वाघमारे लिहीत असे. वाघमारेवर विश्वास ठेवून मी स्टेटमेंटस, व्हाऊचर्स, चेकस्, चलने, इत्यादींवर सह्या करीत असे. माझ्यावरील इतर कामामुळे मी कचेरीत उशिरा येई आणि त्याप्रसंगी वाघमारे कॅशिअरचे काम करी. कामाच्या गर्दीमुळे मी बँकबुके कधीच तपासली नाहीत. " असा गोसावीचा बचाव होता, तो न्यायमूर्ती पालेकर व न्यायमूर्ती आपटे ह्यांनी मान्य करून गोसावीचे अपील मंजूर केले आणि दंडाची रक्कम परत देवविली.


### रशिआ व चीनचे युद्ध अपरिहार्य

न्यूयॉर्क टाइम्सचे जाणते बातमीदार मि. हॅरिसन सलिसबरी ह्यांच्या मताने रशिआ व चीन ह्यांच्यात केव्हाही युद्ध पेटण्याची शक्यता आहे. ते म्हणतात की हे दोन्ही देश कम्युनिस्ट मताचे असले तरी परस्परांतील मतभेद मुत्सद्देगिरीने मिटविता येण्यासारखे नाहीत, अशी त्यांची खात्री झालेली आहे. व्हिएटनाममधील युद्ध थांबावे अशी रशिआची इच्छा आहे. कारण, मग चीन विरुद्धच्या संभाव्य युद्धात अमेरिकेचा दोस्त म्हणून लाभ होण्याची शक्यता रशिआला वाटत आहे. सध्याच रशिआ आणि चीन ह्यांच्यामधील सरहद्दीवर लष्करांची व प्रक्षेपण अस्त्रांची जमवाजमव झालेली आहे.

### महाराष्ट्रात दोन नवे सहकारी साखर कारखाने

महाराष्ट्र सरकारने मध्यवर्ती सरकारला १७ साखर कारखान्यांच्या योजना पाठविल्या होत्या, त्यांपैकी दोन मंजूर झाल्या आहेत. त्यांपैकी एक सांगली जिल्ह्यातील इस्लामपूरची आणि दुसरी सातारा जिल्ह्यातील भुईंजची आहे. १९७०-७१ मध्ये ते कारखाने साखर करू लागतील.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्





१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )

तारेचा पत्ता " मॉर्गेज "

मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र २५६५२७

**मुंबई राज्य सहकारी**
**भू-तारण बँक लि., मुंबई**

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )


महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

वी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
ये. स. बोरगांवकर — कार्यकारी संचालक

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ डिसेंबर १९६८


संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।* कौटिलीय अर्थशास्त्र

## चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची भलावण

नियोजन समितीचे उपाध्यक्ष डॉ. डी. आर. गाडगीळ ह्यांनी अहमदाबाद येथे बोलताना ४थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची भलावण केली आहे. ते म्हणाले की ह्या कार्यक्रमात जी आर्थिक व्यूहरचना करण्यात आली आहे ती मुळात अगदी बरोबर आहे. अर्थातच कार्यक्रमात बदल करण्याचे काही कारण नाही. कार्यक्रम आखतांना काही चुका झाल्या असण्याचा संभव आहे. परंतु कार्यक्रमाचा पाया बळकट घालण्याच्या दृष्टीने आणि पाणी-पुरवठा, शेती आणि विजेची शक्ती ह्यांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने योग्य पावले टाकण्यात आली आहेत. देशातील बचतीमधून साधनसंपत्ती निर्माण करण्याच्या बाबतीत अद्याप यश आलेले नाही. ह्या बाबतींतील कच्चेपणा अमेरिकेकडून पी. एल. ४८० कायद्याप्रमाणे मिळावयाची मदत अपेक्षेप्रमाणे आली नाही त्यावेळी दिसून आला. दुर्दैवाने ह्याच सुमारास देशातील पिकांनाही नैसर्गिक आपत्तीपासून धोका पोचला. त्यामुळे हा कच्चेपणा चांगलाच भोवला. ह्याचाच अर्थ असा की, दूरवर दृष्टी ठेवून आर्थिक धोरणे आखण्यात आलेली नव्हती. नियोजित कार्यक्रम पार पाडण्यासाठी काही किमान प्रयत्न करण्याची इच्छाशक्ती असावी लागते. त्याशिवाय कार्यभाग साधणार नाही. भारताचा औद्योगिक पाया आता विविध स्वरूपाचा झालेला आहे. ह्या औद्योगिक उत्पादनशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग करण्यात आला पाहिजे. त्याचप्रमाणे शेतीच्या उत्पादनातही वेगाने वाढ करण्यात आली पाहिजे. आज चलनवृद्धीचा ताण वाढलेला दिसतो. आपल्या आर्थिक धोरणाच्या अपयशाचे आणि देशातील बचत वाढविण्यातील अपयशाचे ते गमक आहे.

## लघु उद्योगधंद्यांना मंदीचा फायदा

अलीकडे आलेल्या औद्योगिक मंदीच्या लाटेचा लघु उद्योग-धंद्यांना फायदा झाला. त्यातल्या त्यात विजेची हलकी उपकरणे करणाऱ्या धंद्याला आणि हलक्या यांत्रिक साधनांच्या धंद्याला मंदी विशेष उपकारक ठरली आहे. ह्या धंद्यांतील मालाला परदेशांत चांगली बाजारपेठ मिळाली आहे. १९६८ च्या एप्रिल ते जुलै ह्या कालातील वरील धंद्यांची निर्यात १९६७ च्या ह्याच कालातील निर्यातीपेक्षा ७ पटीने अधिक आहे. घरगुती वापराचे रेफ्रिजरेटर्स, वातानुकूल पेट्या, विजेची शक्ती वहन करणाऱ्या तारा, इत्यादींची निर्यात बरीच वाढली आहे. १९६७ मध्ये रेफ्रिजरेटर्स आणि एअर कंडिशनर्स ह्यांच्या निर्यातीने १.२२ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळाले होते. १९६८ मध्ये ह्या मालाच्या निर्यातीने ९ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळाले. विजेच्या निरनिराळ्या प्रकारच्या तारांच्या निर्यातीने मिळालेल्या परदेशीय चलनातही खूप वाढ झाली आहे. १९६७ मधील एप्रिल ते जुलै ह्या काळात ३१.७० लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळाले होते. १९६८ सालातील ह्याच काळात २.५७ कोटी रुपयांचे परदेशी चलन मिळविण्यात आले. भारत सरकारच्या औद्योगिक विकास व कंपनी व्यवहार खात्याने ह्या दोन्ही धंद्यांच्या निर्यातीसंबंधी अभ्यास केला आहे. त्यावरून असे दिसून येते की, १९६८ सालाच्या पहिल्या ६ महिन्यांत छोट्या उद्योगधंद्यांच्या अनेक प्रकारच्या मालाच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. निर्यातवृद्धीचा हा परिणाम आहे. ह्या मालात विजेचे दिवे, कोरड्या विजेऱ्या, घरगुती रेफ्रिजरेटर्स, सायकली, शिवणाची यंत्रे, इत्यादींचा समावेश आहे.

---

## अवाढव्य शहरे ही फार मोठी चूक

प्रसिद्ध ब्रिटिश ग्रंथकार मि. जे. बी. प्रीस्टले आपल्या एका नव्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी अलीकडे न्यूयॉर्कला गेले होते. गेली चाळीस वर्षे ते न्यूयॉर्कला जात आहेत. आता त्यांचे वय ७४ वर्षांचे आहे. तेथे त्यांना धड झोपही मिळू शकली नाही. म्हणूनच की काय त्यांनी मोठ्या अवाढव्य शहरांविषयी आपली नापसंती व्यक्त केली आहे. न्यूयॉर्क शहरांतील गोंगाटाने तर त्यांना भंडावून सोडले. ते म्हणतात की मोठी शहरे स्थापन करण्यात माणसाने फार मोठी चूक केलेली आहे. ह्या शहरांतून मोटारींचे भोंगे, ध्वनिक्षेपण आणि रेडिओ, इत्यादींमुळे आवाजाला खंडच पडत नाही. पॅरिसमध्ये भोंग्यांना बंदी घालण्यात आली आहे. इतर शहरांत मात्र ह्याविरुद्ध उपाययोजना नीट करण्यात आलेली नाही. सर्व मोठी शहरे आता आवाक्यापलीकडे गेली आहेत. त्यांच्या अधिक विस्तारावर बंदी घातली पाहिजे.

---

## आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था अडचणीत

### कमकुवत फ्रँक आणि मजबूत मार्क

[ फ्रान्स, ब्रिटन व अमेरिका ह्यांचेपुढे प्रश्न आहे निर्गत स्वस्त करून आयात महाग करण्याचा, तर जर्मनीपुढे प्रश्न आहे निर्गत महाग करून व आयात स्वस्त करून आपल्या आयात-निर्गतीमधील प्रचंड वाढावा मर्यादित राखण्याचा! मागे सुवर्णाच्या आधारावरील चलन व्यवस्था ढासळली, त्याचे कारण प्रत्येकच देशाला परराष्ट्रीय व्यापारात वाढावा हवा होता. सध्याची आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था अशाच अडचणीत आली आहे. ]

एक वर्षापूर्वी ब्रिटिश पौंडाचे अवमूल्यन झाले, त्यानंतर तीन महिन्यांनी अमेरिकन डॉलरही त्याच मार्गे जाणार अशी चिंताग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती. सोन्याच्या किंमतीत बदल करून डॉलरला सावरण्यात आले. नोव्हेंबरमध्ये फ्रान्सच्या फ्रँकला ग्रहण लागले. फ्रेंच चलनाचे अवमूल्यन अटळ आहे, ह्या कल्पनेने लोक भराभर फ्रँक देऊन जर्मन मार्क खरेदी करू लागले. अब्जावधी फ्रँक अशा रीतीने फ्रान्सबाहेर गेले. गेल्या मे महिन्यात फ्रान्समधील विद्यार्थ्यांनी आणि कामगारांनी दंगली केल्या, तेव्हापासून फ्रँकला धोका निर्माण झाला. तोपर्यंत फ्रँक हे अत्यंत स्थिर चलन होते आणि त्याच्या आधारावर पौंड आणि डॉलर ढासळविण्याचा द गॉल प्रयत्न करीत असे. दंगलीमुळे फ्रान्समधील सर्व कामगारांचे वेतन सुमारे १३% नी वाढवावे लागले. त्याचा परिणाम चलनवाढीत होऊन फ्रँक फ्रान्सबाहेर पळू लागला. फ्रान्सचा सुवर्णसंचय कमी होऊ लागला. ह्यावर उपाय म्हणून उत्पादन वाढीचा कार्यक्रम द गॉलने तातडीने जाहीर केला. पण त्याचा परिणाम दिसावयास वेळ लागणार हे उघड आहे. इकडे जर्मन मार्क मात्र मजबूत होता. औद्योगिक उत्पादनात वाढ, भरपूर निर्गत, कामगार संघांचा कमकुवतपणा, चलनवाढीचा अभाव, ह्यामुळे जर्मनीचा रिझर्व्ह ( सोने, डॉलर व पौंड ह्यांचा साठा ) वाढतच गेला. मार्कचे पुनर्मूल्यन करून त्याची किंमत वाढविली जाईल, असे बोलले जाऊ लागले. अब्जावधी फ्रँक जर्मनीत गुंतविले जाऊ लागले. डॉलर, पौंड, इटालिअन लिरा, बेल्जिअन फ्रँक, ह्यांनीही पलायनाचे बाबतीत फ्रँकचे अनुकरण केले. ७२ तासात १,७७,००,००,००० डॉलर्सच्या किंमतीचे परराष्ट्रीय चलन जर्मनीत लोंढ्याप्रमाणे गेले. प्रमुख १० समृद्ध देशांची सभा बॉन ( जर्मनी ) येथे बोलाविण्यात आली. नाणेबाजार बंद ठेवण्यात आले. मार्क इतर चलनांच्या मानाने अधिक महाग करणे आणि त्याच प्रमाणांत फ्रँकचे अवमूल्यन करणे, असा उपाय अपरिहार्य झाला. त्याच्या अंमलबजावणीमुळे ब्रिटिश पौंड आणि अमेरिकन डॉलर ह्यावरील ताणही कमी झाला असता.

जर्मनीला नव्या आर्थिक बळामुळे अभिमान वाटू लागला होता. "आमच्या आर्थिक अभ्युदयाचे आम्हांस शासन काय म्हणून व्हावे ? बाकीचे सर्व देश आमचा उत्कर्ष न बघून आम्हाला खाली ओढू पाहात आहेत" असे जर्मन बँकर म्हणू लागले. जर्मनीने आयात ४% ने स्वस्त व निर्गत ४% ने महाग करण्याच्या दृष्टीने करविषयक धोरणात बदल करण्याचे मान्य केले. परदेशी चलनाचा येणारा लोंढा थांबविण्यासाठी काही बँकिंग निर्बंधही बसविले. पण तेवढ्याने भागणारे नव्हते आणि फ्रँकच्या अवमूल्यनास संमती देणे फ्रेंचांना भाग पडले. तशी, फ्रँकला मजबुती आणण्यासाठी ह्या १० देशांनी फ्रान्सला २०० कोटी डॉलर्सचे आपआपल्या चलनात कर्ज देण्याचे योजिले. फ्रान्सला नामुष्की वाटू नये म्हणून कर्जाची ही हमी फ्रँकच्या अवमूल्यनावर अवलंबून आहे, असे कुठेही नमूद केले नव्हते. परंतु फ्रँकचे अवमूल्यन होणार ह्या रास्त अपेक्षेने ब्रिटिश पौंडाच्या संरक्षणासाठी ब्रिटनने लोकांच्या खरेदीत कपात घडवून आणून आयातीवर कडक बंधने घातली. बॉन करारामुळे चलनबाजार फार तर तीन महिने सुरळीत चालेल, लवकरच ब्रिटिश पौंडाचेहि अवमूल्यन करावे लागेल, त्याच्या पाठोपाठ अमेरिकन डॉलरवर सट्टेबाज हल्ला चढवितील, डॉलर पडला तर १९३० च्या परिस्थितीप्रमाणे जागतिक गोंधळाची परिस्थिती होईल, असे बोलले जात होते. ते टाळण्यासाठी जागतिक परिषद् बोलावण्यात यावी, असेही सुचविण्यात येत होते. बॉन येथील झालेला "सभ्य गृहस्थांचा" करार फ्रेंच सरकारने अमान्य केला. संबंध युरोपातील आर्थिक व्यवहारात घोटाळे उत्पन्न झाले तरी हरकत नाही, पण आपली चूक कबूल करण्यास द गॉल तयार नव्हता. त्याने फ्रँकचे अवमूल्यन न करण्याचा निर्धार जाहीर केला. सहकार्याच्या आधारावर रचलेली आंतरराष्ट्रीय चलन पद्धती २४ वर्षे सुरळीत चालली, ती आता धोक्यात आली आहे. त्यातून आर्थिक धुमाकूळ जागतिक होण्याचा संभव आहे.

---

### माऊचे धूम्रपान

माउत्सेतुंग दररोज स्टेट एक्सप्रस ५५५ सिगारेटची तीन पाकिटे फस्त करीत असे. त्याने आता सिगारेट सोडून सिगार ओढण्यास प्रारंभ केला आहे. माऊला चालू महिन्यात ७५ वर्षे पुरी होतील.

---

### पाकिस्तानी मुस्लिम लीगला हिंदी कंपन्यांच्या देणग्या

दोन हिंदी कंपन्यांनी—गणेश फ्लोअर मिल्स आणि दिल्ली क्लॉथ अँड जनरल मिल्स—१९६५ मध्ये पाकिस्तानी मुस्लिम लीगला अनुक्रमे ४०,००० रु. आणि १,३९,३७९ रु. अशा देणग्या दिल्या. दोन्ही कंपन्यांचे पश्चिम पाकिस्तानात लियालपूर येथे कारखाने आहेत; त्या केंद्रांनी ह्या दिल्याचे सांगण्यात येते.

# बुद्धिमंतांचा अमेरिकेकडे वाहणारा ओघ

## अविकसित देशांना विशेष मारक

## (२)

५०-६० वर्षांपूर्वी अमेरिकन विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जर्मनीला जात असत व शिक्षण पूर्ण झाल्यावर परत येत असत. परत आल्यावर शास्त्रीय तांत्रिक क्षेत्रांतील पुढारीपण त्यांच्याकडे जात असे. तशीच परिस्थिती आज अमेरिकेत शिकून मायदेशी जाणाऱ्या शास्त्रज्ञांची व तंत्रज्ञांची आहे. त्यांनाही असेच पुढारीपण प्राप्त होत आहे. असे एक नाट्यमय पण अमेरिकेच्या दृष्टीने दुःखदायक उदाहरण देण्यासारखे आहे. कम्युनिस्ट चीनचे अण्वस्त्र व अण्वस्त्रपद्धती शोधून काढणारे पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ अमेरिकेत शिकून तयार झालेले आहेत. शिवाय शिकण्यासाठी परदेशात गेलेल्यांचे मन वळवून त्यांना परत आणता येत नाही असेही नाही. दक्षिण कोरियाने स्वतःची अणुविज्ञान संशोधन संस्था काढली त्या वेळी संस्थेचे सरचालक अमेरिकेत आले व अमेरिकेत स्थायिक झालेल्या स्वतःच्या देशबांधवातून त्यांनी जरूर ते तंत्रज्ञ मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांना असे वाटले की जेमतेम १०–१२ माणसे मिळाली तरी मिळवले. पण प्रत्यक्षात वर्षाला ३ हजार डॉलर्स पगारावर काम करण्यास तयार असलेले ७५ लोक त्यांना मिळाले. स्वदेशात प्रतिष्ठितपणाने राहाता येईल इतका पगार, कौटुंबिक सोय आणि प्रयोगशाळेच्या आवारातच अमेरिकन पद्धतीची राहती जागा इतके मिळाल्याबरोबर हे लोक स्वदेशी जाण्यास तयार झाले. लोकांच्या गरजा काय आहेत ते ओळखून त्यांना योग्य अशी संधी दिल्यास कितीतरी तंत्रज्ञ स्वदेशी जाण्यास तयार होतात असा अनुभव आहे. काही वर्षांपूर्वी चिली देशातील कॅथॉलिक विद्यापीठाने शिकॅगो विद्यापीठात ३० चिली विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राचे शिक्षण देवविले. त्यांपैकी १० पीएच. डी. पर्यंत शिकले होते. ह्या विद्यार्थ्यांपैकी पुष्कळांना अमेरिकेत नोकऱ्या मिळत होत्या. पण कॅथॉलिक विद्यापीठाने स्वदेशात त्यांना नोकऱ्या देऊ केल्याबरोबर सर्वजण परत मायदेशी गेले.

ब्रिटनमधून परदेशी गेलेल्या नागरिकांना परत आणण्याचे जोराचे प्रयत्न सध्या करण्यात येत आहेत. हे काम करण्यासाठी खास समित्या अमेरिकेला पाठविण्यात येत आहेत. अणुविज्ञान, वैद्यक, इलेक्ट्रॉनिक्स, इत्यादी क्षेत्रांतील ब्रिटिश तज्ज्ञ परत आणण्यासाठी न्यूयार्क येथे मुद्दाम एक कचेरीही स्थापन करण्यात आली आहे. अमेरिकेला गेलेले ब्रिटिश नागरिक तेथे मजेत आहेत. परंतु तरीही त्यांना मायदेशाला यावेसे वाटते. ह्या दोन देशांत असलेले सर्वच फरक त्यांना सुखवितात असे नाही. काहींच्या मताने अमेरिकन लोक अपेक्षा होती त्यापेक्षा कमी स्नेहशील आहेत. स्त्रियांना माहेरची व आईची आठवण येते. दुपारी घटकाभर बसायला येणारे व चहा पिऊन जाणारे शेजारी अमेरिकेत लाभत नाहीत. त्यामुळे स्त्रियांना बराच काळ एकटे घालवावा लागतो. त्यांना नोकर परवडत नाहीत. बाजारहाट, विशेषतः अन्नपदार्थांचा बाजारहाट म्हणजे अमेरिकेत एक दिव्यच आहे. त्याची संवय होणे अवघड जाते. ब्रिटनमध्ये राष्ट्रीय आरोग्य-संघटना असल्याने ब्रिटिश नागरिकांना आरोग्याचा विमा अंगवळणी पडलेला असतो. पण, अमेरिकेत डॉक्टरांची बिले म्हणजे भय वाटण्याची एक बाब होऊन बसली आहे. पुरुषांना खेळ खेळण्याच्या सोयी फारशा नाहीत. परदेशात गेलेल्या नागरिकांनी आधी आपल्या मायदेशी बरीच भ्रमंती केलेली असते. पुष्कळांनी अनेक नोकऱ्या केलेल्या असतात. शास्त्रीय कामातील आणि इस्पितळाशी संलग्न असलेल्या कामातील चाकोरी जगात सर्वत्र सारखीच असते. त्यामुळे परदेशात प्रयाण करणाऱ्यांना जुळवून घेण्यात काहीच अडचण वाटत नाही. अमेरिकेत जाणारे बहुतेक परदेशी लोक ३० वर्षांखालील असतात. एकंदरीने पुरुष अमेरिकेतील नोकरीशी व जीवनाच्या चाकोरीशी लवकर व सहज समरस होतात. स्त्रियांना मात्र घराची ओढ लागते. पण अशा स्त्रियांना जर त्यांच्या मायदेशाला पुनर्भेट देण्यासाठी भरपूर पैसा दिला तर त्याही मधून मधून 'घरी' जाऊन येतात आणि परत येऊन आयुष्यात रमतात. असे असले तरी घराची सर पूर्णत्वाने येत नाहीच.

परदेशप्रयाण करणाऱ्या नागरिकांचा हा प्रश्न त्या त्या देशांचा प्रश्न प्रामुख्याने असला तरी अमेरिकेवर त्याची मुळीच जबाबदारी नाही असे म्हणता येत नाही. दुसऱ्या देशांतील तज्ज्ञांच्या मर्यादित संख्येतून केवळ मोठ्या पगाराच्या आमिषाने प्रशिक्षित खेचून घेणे केव्हाही योग्य ठरणार नाही. अमेरिकेने परदेशातील बुद्धिमंतांचा ओघ घटविण्यासाठी अद्याप तरी फारशी कृती केलेली नाही. नाही म्हणावयास परदेशातून येणाऱ्या काही विद्यार्थ्यांना 'जे' हा खास परवानाच देण्यात येतो. शिक्षण संपल्यावर त्यांनी अमेरिका सोडली पाहिजे अशा अटीवरच तो देण्यात येतो. म्हणूनच पुष्कळ विद्यार्थी परत जातात. १९६५ साली अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्यांसाठी असलेल्या कायद्यात बदल करण्यात आला. ज्या लोकांच्या कौशल्याची अमेरिकेला गरज होती त्यांना प्रवेशासंबंधी अग्रहक्क देण्यात आला. त्यामुळे बुद्धिमंतांचा ओघ थोडासा वाढला. परंतु गेल्या १ जुलैपासून अर्जाच्या अनुक्रमाने प्रवेशपरवाना देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. त्यामुळे युरोपमधील शास्त्रज्ञांना व इंजिनिअरांना ओळीतील मागच्या रांगेत जावे लागले. पण, त्यामुळे आशिआतून येणाऱ्यांची संख्या वाढण्याचा संभव आहे. परदेशातून येणारा हा ओघ थांबवावयाचा म्हटले तर अमेरिकेला आपल्या शास्त्रज्ञांच्या व तंत्रज्ञांच्या गरजा देशातील लोकांमधूनच भागविल्या पाहिजेत.

गेल्या तीन वर्षांत अमेरिकेत जागाऱ्या परदेशी इंजिनिअरांची संख्या वाढली आहे, आणि अमेरिकेतील इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे. गेल्या काही महिन्यांत परदेशी इंजिनिअरांना व तंत्रज्ञांना असलेली मागणी रोडावली आहे. एक कारण म्हणजे सरकारने संशोधनावरील खर्चात कपात केली आहे. येणाऱ्यांची राजकीय छाननी अधिक कसोशीने होऊ लागली आहे. त्यामुळे माणसे मिळवणारी कंपन्यांची खाती बंद करण्यात येत आहेत. अमेरिकेच्या व्हिएटनाममधील धोरणाचाही परिणाम झाला आहे. ज्या लोकांनी एरवी प्रवेशपरवान्यासाठी अर्ज केले असते त्यांनी ते करण्याचे लांबणीवर टाकले आहे. पुष्कळांना अमेरिकेच्या लष्कर-भरतीच्या कायद्याची भीती वाटते. म्हणून ते आपली मुले अमेरिकेत धाडत नाहीत. अमेरिकेतील शहरांतून होणाऱ्या निग्रोंच्या दंगलीचीही पुष्कळांनी धास्ती घेतली आहे. तरीसुद्धा १९६०-६५ च्या दरम्यान ज्या आर्थिक परिस्थितीतून परदेशी बुद्धिमंतांचा ओघ अमेरिकेत येऊ लागला ती परिस्थिती तशीच कायम आहे. अमेरिकेतील दारिद्र्यावर अलीकडेच लक्ष केंद्रित होऊ लागले आहे. त्यामुळे अमेरिकेतील राहणीचे मान इतर देशांतील राहाणीच्या मानाने भलतेच पुढारलेले आहे आणि ते अधिकच पुढारत आहे, ह्या वस्तुस्थितीवर पांघरूण पडते. युरोपमधील कोणत्याही देशांतील कामगारांच्या उत्पन्नाची जी सरासरी पातळी आहे तेथे अमेरिकेमधील दारिद्र्याची रेषा सुरू होते. ह्याला अपवाद फक्त स्वित्झरलंड आणि स्वीडनचा आहे. अमेरिकेतील संशोधनातील गुंतवणूक सध्या जरी मंदावली असली तरी ती जगातील इतर देशांच्या मानाने वेगाने वाढत आहे. अमेरिकेने बुद्धिमंतांच्या ह्या एकतर्फी प्रवाहाकडे आज दुर्लक्ष केले तर अनेक बर्लिनच्या भिंतींना आमंत्रण दिल्यासारखे होईल. अशा भिंती उद्या दोस्त म्हणवणाऱ्या देशांतही उभारल्या जाण्याचा धोका आहे. (समाप्त)

---

### बी-बियाणांच्या उत्पादनासाठी कॉर्पोरेशन

गंगेच्या खोऱ्यातील तराई प्रदेशात बी-बियाणांचे उत्पादन करण्यासाठी एका स्वतंत्र कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात येणार आहे. ही संघटना सुधारलेल्या बियाणांवर संस्करण करणे, त्यांचा साठा करणे आणि त्यांची विक्री करणे ही कामे करील. कॉर्पोरेशनच्या स्थापनेला जागतिक बँकेकडून कर्जरूपाने मदत मिळविण्यासाठी वाटाघाटी चालू झाल्या आहेत. तराई प्रदेशातील ३२ हजार एकर जमीनीत सुधारलेल्या बियाणांचे उत्पादन करण्यात यावयाचे आहे. मेक्सिकन जातीचा गहू, नवा संकरज मका, एकरी अधिक पीक देणारे भात, इत्यादींचे बियाणे तेथे तयार करण्यात येणार आहे. दरसाल सुमारे ५६ हजार टन सुधारलेले बी-बियाणे तयार होईल असा अंदाज आहे. तसे झाल्यास भारताच्या सुधारलेल्या बी-बियाणाची १४ टक्के गरज भागविली जाईल.

### बुद्धिमंतांच्या देशांतराचा अमेरिकेला फायदा

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक समितीने बुद्धिमंतांच्या देशांतराच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याचा आदेश गेल्या वर्षी दिला होता. हा अभ्यास पूर्ण झाला असून त्यावर आधारलेला अहवाल आता संघटनेकडे आला आहे. भारतामधून अमेरिकेला आणि इतर प्रगत देशांना जाणाऱ्यांची संख्या अलीकडे वाढत चाललेली आहे. त्यात पुष्कळसे प्रशिक्षित व्यावसायिक अमेरिकेला जातात; परिचारिकाही मोठ्या प्रमाणावर जातात. ह्या लोकांचे शिक्षण भारतात झालेले असते. त्यांच्या शिक्षणावर झालेल्या खर्चाचा फायदा अर्थातच परदेशांना मिळतो. १९६७ साली ह्या रीतीने अमेरिकेला भारताकडून ५१ लाख डॉलर्सचा फायदा झाला, अशी माहिती अहवालात देण्यात आली आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, विकसनशील देशांतून काही थोड्या प्रगत देशांकडे जाणारा हा प्रशिक्षित बुद्धिमंतांचा ओघ झपाट्याने फुगत चालला आहे. भारतासारख्या काही विकसनशील देशांतून तर ह्या प्रश्नाला राजकीय रंगही चढू लागला आहे. त्यामुळे अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटनसारख्या प्रगत देशांचा मात्र फायदा होत आहे. भारतामधून बुद्धिमंत बाहेर पडण्यास अनेक कारणे प्रभावी ठरत आहेत. त्यांतील प्रमुख कारण तुटपुंजे वेतन हे आहे. परंतु त्याशिवाय मनुष्यबळाचा उपयोग करून घेण्याच्या योजनेचा अभाव, गरजेपेक्षा अधिक इंजिनिअरांची निर्मिती, हीही कारणे आहेत. गेल्या वर्षीच्या ३० जून रोजी पुऱ्या होणाऱ्या पाच वर्षांच्या अवधीत भारतामधून ६,१२१ कुशल व्यावसायिक अमेरिकेला आणि ३,१८० कॅनडाला गेले. त्यांच्या ज्ञानाला भारत मुकला.

---

### प्रे. निक्सनसंबंधी रशिआची वृत्ती बदलली


अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत प्रेसिडेंट निक्सन विजयी झाले. प्रे. निक्सन हे कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचे विरोधक म्हणून गाजलेले आहेत. निवडणूक होण्यापूर्वी ते रशिआला गेले असताना त्यांची उपेक्षा करण्यात आली होती. कोणत्याही बड्या रशिअन पुढाऱ्याने त्यांची भेट घेण्याची आस्था दाखविली नव्हती. आता मात्र रशिआचा नूर पालटला आहे. पश्चिम युरोपातील इतर देश त्यांच्या कम्युनिस्टविरोधी मतांना प्राधान्य देत आहेत. रशिआ मात्र त्यांच्या भूतकालीन राजकीय मताकडे दुर्लक्ष करीत आहे. 'प्रवदा' ह्या पत्राच्या एका संपादकाने असे म्हटले आहे की मि. निक्सन यांचा भूतकाल स्पष्ट आहे. रशिआला त्यांच्या भावी कृतीशीच कर्तव्य आहे.

---

### वाचलेल्या पृष्ठांची संख्या काय दर्शविते ?

वाचनाचे प्रमाण दरसाल दरमाणशी २,००० पृष्ठे पडले, तर तो जागृत, बहुश्रुत होतो, असा 'युनेस्को'च्या तज्ज्ञांचा निष्कर्ष आहे. भारतातील ते प्रमाण दरसाल दरमाणशी फक्त ३२ पृष्ठे आहे आणि त्यांपैकी १६ पृष्ठे पाठ्यपुस्तकांची असतात.

## श्री. सुंदरलाल वर्धासा कळमकर



श्री. सावजी ह्या नावानेच श्री. कळमकर हे सुपरिचित आहेत. त्यांचा जन्म जिंतूर येथे झाला. इंटरमिजिएटपर्यंत शिकून पुढे त्यांनी वकिलीची परीक्षा दिली. गुंतूर येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. वडिलांचा सावकारीचा व्यवसाय होताच, तोही ते पाहू लागले.

दि. १-१०-१९५८ रोजी परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून त्यांची सरकारकडून नियुक्ती झाली. तेव्हापासून आजपर्यंत ते चेअरमन आहेत. जिंतूर येथे सहकारी जिनिंग प्रेसिंग सोसायटी, परभणी येथे जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ व जिल्हा औद्योगिक सहकारी संघ वगैरेच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेऊन त्यांची अध्यक्षपदे भूषवीत आहेत. सन १९६७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचे तिकिटावर महाराष्ट्र विधान सभेवर त्यांची निवड झाली. त्यांचा स्वभाव सौजन्यशील, शांत, अभ्यासू व काटकसरी आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आज २९ शाखा आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँकेस सावजींची बँक म्हणून ओळखतात, एवढे ते त्या बँकेशी एकरूप आहेत.

### सुती कापडच खेड्यात लोकप्रिय

सुती कापड समितीच्या संशोधन शाखेने कापडाची लोकप्रियता अजमावण्यासाठी महाराष्ट्रात एक पाहणी केली होती. त्यावरून असे दिसून आले की, कापसाच्या सुतापासून बनविलेल्या कापडालाच खेडेगावात लोकप्रियता लाभली आहे. मुंबईत मात्र ह्या कापडाची लोकप्रियता खूपच घटली आहे. अलीकडे कृत्रिम धाग्याच्या कापडाची कापसाच्या धाग्याच्या कापडाशी स्पर्धा होऊ लागली आहे. परंतु कृत्रिम धाग्याच्या कापडाला मोठ्या उत्पन्नाच्या गटातील लोक आणि तरुण वयाचे लोक हेच काय ते पसंत करतात. शिवाय, कापडाच्या पसंतीत व्यवसाय-धंद्याप्रमाणे आवडीनिवडी बदललेल्या दिसून येतात.

---

### शापित कंठ्याला गिऱ्हाईक नाही

दरभंग्याच्या महाराजांच्या मालकीच्या जडजवाहिराचा पाटणा येथे अलीकडे लिलाव करण्यात आला. ही सर्व संपत्ती दरभंग्याचे महाराज कामेश्वर सिंग ह्यांची होती. असे म्हणतात की, निजामाजवळ असलेल्या जडजवाहिरापेक्षाही त्यांच्याजवळील रत्नजडित भूषणांची किंमत अधिक होती. त्यांच्या ह्या जवाहरखान्यात फ्रान्सची राणी मेरी अँटोनिटी हिचा एक रत्नजडित कंठा होता. तो त्यांनी इंग्लंडमध्ये घेतला होता. हा कंठा शापित असल्याची वदंता आहे. ती खरी असो अगर नसो; पण राणीचा फ्रेंच राज्यक्रांतीत शिरच्छेद झाल्याचे इतिहासात नमूद आहे. दरभंग्याच्या महाराजांनी कंठा घेतला; पण त्यांना औरस पुत्र झाला नाही. त्यामुळे त्यांचे संस्थान खालसा झाले. नुकत्याच झालेल्या लिलावात ह्या शापित कंठ्याला गिऱ्हाईक मिळाले नाही. त्याची किंमत ११ लाख रुपये आहे.

---

### एक हजार कृषिउद्योग सहकारी संस्थांची स्थापना

४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत १ हजार नव्या कृषिउद्योग सहकारी संस्था स्थापन करण्यात यावयाच्या आहेत. त्यांच्या स्थापनेनंतर अशा संस्थांची संख्या २,६०० इतकी होईल. कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत ह्या संस्थांमधून ४०० कोटी रुपयांच्या भांडवलाची गुंतवणूक होईल. भारतात सध्या शहरी विभागातील अर्थव्यवस्था आणि ग्रामीण विभागातील अर्थव्यवस्था ह्यांच्यात पुष्कळ तफावत आहे. ग्रामीण भागात पैशाच्या तुटीमुळे अडचणी निर्माण होतात. शेती मालाच्या संस्करणावर आधारलेले उद्योगधंदे देशभर विखुरण्यात आले तर ह्या दोन विभागांतील अंतर भरून काढण्यास चांगली मदत होईल अशी अपेक्षा आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## रशिआच्या मदतीने ट्रॅक्टर्स बनविणार

रशिआच्या मदतीने १५ अश्वशक्तीचे ट्रॅक्टर्स बनविण्याच्या एका योजनेला भारत सरकारने संमती दिली आहे. ट्रॅक्टर्सचा कारखाना काढण्याच्या कामी रशिआ एका खाजगी भांडवलाच्या कंपनीशी सहकार्य करणार आहे. कारखान्यासंबंधीचे तांत्रिक ज्ञानही रशिआच देणार आहे. रशिअन एंजिनिअर्स भारतात येऊन कारखाना उभारून देतील आणि हिंदी तंत्रज्ञांना शिक्षणही देतील. कारखाना उभारण्यासाठी १० कोटी रुपये भांडवल लागेल, आणि त्यातून दरसाल १० हजार ट्रॅक्टर्स तयार होऊ शकतील. पहिल्या वर्षी ५० टक्के भागच देशातील वापरण्यात येतील. दुसऱ्या वर्षी ७५ टक्के देशी भागांचे आणि तिसऱ्या वर्षी सर्वस्वी भारतीय बनावटीचे ट्रॅक्टर्स तयार होऊ लागतील. १९६७–६८ साली भारतामधील ट्रॅक्टर्सचे उत्पादन अवघे ११,३९५ इतके झाले परंतु ट्रॅक्टर्सची मागणी मात्र ५० हजार होती. सुमारे ७० हजार शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या नोंदविल्या असून प्रत्येकी ५०० रुपयांची अनामत रक्कम पोस्टाच्या बचत खात्यात भरलेली आहे. गेल्या दहा महिन्यांत रशिआतून ट्रॅक्टर्सची आयात करण्यात आलेली नाही. भारत सरकारच्या मालकीच्या ॲग्रो-इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशनमार्फत रशिअन ट्रॅक्टर्सचे वितरण व्हावे अशी सूचना करण्यात आली होती. परंतु रशिआस ती पसंत पडली नाही. कारण कॉर्पोरेशनच्या शाखा सर्व राज्यांतून नाहीत. शिवाय ट्रॅक्टरच्या दुरुस्तीची व देखभालीची सोयही कॉर्पोरेशन करीत नाही. सध्या कॉर्पोरेशन झेक बनावटीच्या ट्रॅक्टर्सचे वितरण करीत आहे. तेव्हा दुसऱ्या एखाद्या बनावटीचे ट्रॅक्टर्स त्याच वितरण संस्थेकडे देणे व्यापारी प्रघाताला सोडून झाले असते.

---

## रेल्वेखात्याच्या आर्थिक अडचणी वाढणार ?

हिंदी रेल्वेला गेल्या दोन वर्षांपासून आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. पुढील वर्षीही ह्या अडचणी कमी होण्याची चिन्हे फारशी दिसत नाहीत. रेल्वेचा कारभार चालविण्याच्या खर्चात वाढ होत चाललेली आहे. रेल्वे कामगारांचे पगार वाढवावे लागत आहेत व रेल्वेला घ्याव्या लागणाऱ्या सामानाच्या किमतीही वाढत चालल्या आहेत. पण, त्यामानाने प्रवासाच्या व माल वाहतुकीच्या दरात मात्र प्रमाणशीर वाढ झालेली नाही. रेल्वेच्या आर्थिक बाजूकडे लक्ष देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मताने दोन्ही दरांत आणखी वाढ करणे जरुरीचे आहे. तथापि, त्याचबरोबर रेल्वेची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्नही करण्यात येणार आहेत. रेल्वेच्या कामात अधिक सुसूत्रता आणणे, गाड्यांचे वेग वाढविणे, अधिक लांब गाड्या ओढणे, इत्यादी उपायांचा विचार चालू आहे.

---







### कोळशाचा उपयोग करून खताचे उत्पादन

चौथ्या पंचवार्षिक योजनेतील खताच्या उत्पादनाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने भारत सरकारच पेट्रोल आणि रसायन खाते एका नव्या तांत्रिक उपक्रमाचा विचार करीत आहे. भारतात मध्यम दर्जाचा दगडी कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. त्याचा उपयोग करून अमोनिआचे खत निर्माण करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील, असे आता दिसून आले आहे. ह्या बाबतीत खात्याकडे आलेला तांत्रिक पुरावा उत्तेजनक आहे. ह्या कोळशाचा उपयोग करून वरील खत निर्माण करण्याचा प्रयोग अल्पशा प्रमाणात पश्चिम जर्मनीत करण्यात आला आहे. तो यशस्वी झाला असल्यामुळे खताच्या उत्पादनाच्या बाबतीत एक नवीनच दिशा उपलब्ध होण्याची शक्यता दिसत आहे. खताच्या उत्पादनतंत्रात जर्मनीतील प्रयोगामुळे मूलभूत स्वरूपाचा फरक पडणार आहे. जर्मनीत उपलब्ध झालेल्या नवीन तंत्राचा उपयोग करून घेण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील झाले असून लवकरच भारतीय तंत्रज्ञांचे एक मंडळ पश्चिम जर्मनीला रवाना होईल. हिंदी रासायनिक तज्ज्ञांच्या मताने जर्मनीत सध्या तयार असलेल्या यंत्रसामग्रीत काही योग्य फेरफार केल्यास अशी यंत्र-सामग्री भारतात आर्थिक दृष्ट्या परवडणारी होऊ शकेल. सध्या जर्मनीत उभारण्यात आलेल्या प्रयोगात्मक यंत्रसामग्रीच्या साह्याने दररोज ३०० टन अमोनिआची निर्मिती होऊ शकते. भारतात मात्र इतक्या छोट्या उत्पादनक्षमतेची यंत्रसामग्री उभारून चालणार नाही. दररोज निदान १ हजार टन अमोनिआ निर्माण करू शकणारी यंत्रसामग्री उभारणे आवश्यक आहे.

---

### वैद्यकी आणि बँकिंग ह्यांची जोडी

"भारताच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी वैद्यकीय आणि बँकिंग सोयी-सवलतींची तेथे आवश्यकता आहे. खेड्यात जाऊन व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांना आमची बँक मदत करण्यास तयार आहे. त्याचप्रमाणे, डॉक्टरांना सहा महिने बँकिंगचे शिक्षण देण्यास आमची बँक तयार आहे. त्यांनी मग बँकेचे कर्मचारी म्हणून आकर्षक पगारावर खेडेगावात कामाला जावे. बँकेचे काम संभाळून उरल्या वेळात त्यांनी वैद्यकीय व्यवसाय करायला हरकत नाही." कॅनरा बँकेचे चेअरमन, श्री. के. पी. जे. प्रभू ह्यांचे मंगलोर येथे भाषण.

---

### सहकारी बँकांतील ठेवींना विम्याचे संरक्षण

सहकारी बँकांच्या ठेवींना विम्याचे संरक्षण देणारे डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन (दुरुस्ती) बिल लोकसभेने मंजूर केले आहे. सध्या फक्त व्यापारी बँकांच्या ठेवींनाच हे संरक्षण उपलब्ध आहे. ह्या बिलाच्या उद्दिष्टाचे पूर्तीसाठी आता राज्य सरकारांना स्वतःचे सहकारी कायदे दुरुस्त करून रिझर्व्ह बँकेचे जास्त नियंत्रण पत्करावे लागेल.

### टेलिग्राफ तारांची चोरी

टेलिग्राफच्या तारांची चोरी वाढत्या प्रमाणात होत आहे, त्याला आळा घालण्यासाठी अशा चोरांना कडक शिक्षा देता येण्याची तरतूद करणारे बिल लोकसभेत मांडण्यात आले आहे. तांब्याच्या तारांच्या ऐवजी तांब्याचा मुलामा असलेल्या अल्युमिनमच्या किंवा लोखंडी तारा घालण्याचे काम चालू आहे. ९,००,००० किलोमिटर लांबीच्या तारांपैकी फक्त २% तारा अशा रीतीने बदलून झाल्या आहेत.

---

### नॅ. टे. कॉर्पोरेशनच्या बोर्डावर कामगार प्रतिनिधी ?

'सिक' गिरण्या चालविण्यास घेणाऱ्या नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डावर कामगारांना प्रतिनिधित्व देण्याचा विचार व्यापारमंत्री करीत आहेत.

---

### इनकमटॅक्सचे फिल्मी थकबाकीदार

दर वर्षी १ लक्ष रुपयांपेक्षा जास्त प्राप्ती असणाऱ्या ८० फिल्म नट-नट्या आणि कंपन्या ह्यांनी गेल्या ५ वर्षांत इन्कम-टॅक्स भरण्यात कुचराई केली आहे. त्यात राजकपूर, राजश्री, लता मंगेशकर, देवआनंद, वहिदा रहिमान, जेमिनी पिक्चर्स (प्रा.) लि, इत्यादी नावे आहेत. थकबाकी वसूल करण्यासाठी योग्य ती कारवाई केली जात आहे, असे अर्थमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले.

---

### पूर्व पाकिस्तानात अणुशक्ती केंद्र

रुपूर (पूर्व पाकिस्तान) येथे अणुशक्ती केंद्र स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार करण्यासाठी पाकिस्तान आणि रशिआ ह्यांच्यामध्ये करार झाला आहे.

---

### पाकिस्तानला कॅनडाचा गहू

आतापासून जुलै, १९६९ अखेरीपर्यंत कॅनडा पाकिस्तानाला ५,८५,००,००० बुशेल गहू पुरविणार आहे. १९६६ पासून आतापर्यंत कॅनडाने पाकिस्तानाला २३,५०,०१,००० बुशेल गहू दिला आहे.

---

### पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकांत २ कोटी ठेवीदारांचे १,६५० कोटी रु.

ग्रामीण भागातील बचत आकृष्ट करण्यासाठी सेव्हिंग्ज बँक खाती असलेल्या पोस्ट ऑफिसांची संख्या त्वरेने वाढविण्याची योजना आखण्यात येत आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर अशा पोस्ट ऑफिसांची संख्या १,००,००० वर जाईल. १९६६-६७ अखेर पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांतील ठेवीची रक्कम १,५४० कोटी रु. होती, ती १९६७-६८ अखेर १,६५० कोटी रु. झाली आणि ठेवीदारांची संख्या १·८८ कोटींवरून २ कोटींवर गेली.

### इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनची प्रगती

हिंदची अर्थव्यवस्था मिश्र स्वरूपाची आहे. म्हणजे तीत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना व इतर उत्पादक संघटनांना वाव ठेवण्यात आला आहे. त्याचबरोबर काही मूलभूत स्वरूपाच्या उत्पादन संघटना सार्वजनिक मालकीच्या ठेवण्यात आल्या आहेत. सार्वजनिक मालकीच्या संघटना कार्यक्षमतेने चालविण्यात येत नाहीत अशी टीका करण्यात येत असते. ही टीका इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनने आपल्यापुरती निराधार ठरविलेली आहे. कॉर्पोरेशनने गेल्या वर्षी ६ टक्के नफा जाहीर केला होता. चालू वर्षाच्या नफ्यात १ टक्क्याने वाढ करण्यात आलेली आहे. त्यावरून कॉर्पोरेशनच्या प्रगतीची कल्पना येते. गेल्या कांही वर्षात कॉर्पोरेशनच्या विक्रीत आणि नफ्यात वेगाने वाढ होत आहे. अर्थातच भांडवल गुंतवणूकीच्या दृष्टीने कॉर्पोरेशनमधील गुंतवणूक पहिल्या प्रतीची झाली आहे. गेल्या वर्षी कॉर्पोरेशनची विक्री २७ टक्क्यांनी वाढून ४०० कोटी रुपयांपेक्षाही अधिक झाली. चालू वर्षी विक्रीत आणखी वाढ होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. खनिज तेलाची विक्री करण्यात कॉर्पोरेशनचा भारतात पहिला क्रमांक आहे. तेल विक्रीच्या धंद्यापैकी ४० टक्के धंदा कॉर्पोरेशनच्या हाती आहे. विक्रीत झालेल्या वाढीमुळे नफ्यात वाढ होणे अपरिहार्यच होते. कॉर्पोरेशनचा नफा आता १० कोटींपेक्षा अधिक झाला आहे. वसूल भांडवलाच्या १५ टक्के हे प्रमाण पडते. ह्यापेक्षाही अधिक नफा झाला असता. परंतु कॉर्पोरेशनला निर्यातीच्या व्यापारात आणि वाहतुकीच्या बाबतीत तोटा सहन करावा लागतो. भारतात खनिज तेलाच्या उत्पादनाचा धंदा तुलनेने नवा आहे. त्यामुळे त्यामधील अनुभवजन्य ज्ञान वाढविण्यास अजूनही जागा आहे.

---

### काश्मीरमधील लष्करामुळे भारताचीच अडचण

पाकिस्तानच्या हवाई दलाचे माजी प्रमुख अझगर खान ह्यांनी अलीकडे पाकिस्तानच्या संरक्षण व्यवस्थेबद्दल एक लेख-मालिका लिहिली आहे. त्यात ते म्हणतात की काश्मीरमध्ये लष्कर ठेवल्यामुळे पाकिस्तानपेक्षा भारतालाच अडचणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. काश्मीरमधील हिंदी लष्कर जितके अधिक असेल तितकी हिंदची संरक्षण व्यवस्था दुबळी होईल. कारण, काश्मीरमधील हिंदी लष्कर खाली मैदानावर लढल्या जाणाऱ्या युद्धाला फारशी मदत करू शकणार नाही. उलट, ह्या लष्कराची भारताशी असलेली दळणवळणाची व वाहतुकीची साधने कच्ची व दीर्घ अंतरावर पसरलेली असल्याने त्याची कोंडी होण्याचा धोका अधिक आहे. अशी कोंडी झाल्यास ती घातक ठरेल.

**अर्थ** (पाक्षिक)
महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह
"दुर्गाधिवास" पुणे ४.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.